**<u>वादी सा.क्र.२ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. बी.एम.दळवी यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

०६. मी दहावी पास आहे. मी मिठबावकरवाडी येथे राहतो. हे खरे की, वादी, प्रतिवादी राणेवाडी येथे राहतात. हे खरे की, मी सन २०१२ ते २०१७ सौंदाळे गावचा सरपंच होतो. हे खरे की, मी ग्रामपंचायतीच्या पैशाचा अपहार केला म्हणून माझ्या विरुध्द गटविकास अधिकारी, देवगड यांनी वसुलीचा हुकूम केला होता. हे खरे नाही की, मला ते सगळे पैसे भरावे लागले होते. हे खरे नाही की, सर्व गावाला ही बातमी कळाली होती. हे खरे की, या कारणाने गावातील लोकांनी माझ्याविरुध्द उपोषण केले होते. हे खरे की, त्यामुळे मी गावातील ४७ लोकांविरुध्द या न्यायालयात समरी फौजदारी खटला नं.३२/२०१९ हा दाखल केला आहे. हे खरे की, हा खटला सध्या प्रलंबित आहे. हे खरे नाही की, या खटल्यात वादी क्र.१क हा साक्षीदार आहे. हे खरे की, वादी क्र.१क व माझे संबंध चांगले आहेत. हे खरे नाही की, प्रतिवादी मंगेश व माझे संबंध चांगले नाहीत.

०७. हे खरे की, प्रतिवादी मंगेश यांची सौंदाळे गावात शेती आहे. हे खरे की, प्रतिवादीचे आजोबा महिपत यांना मधुकर, सिध्दु व गजानन असे मुलगे होते. हे खरे नाही की, मधुकर हे गावी शेती करत होते. हे खरे की, गजानन व सिध्दु हे मुंबईत नोकरी करत होते. हे खरे नाही की, त्यामुळे त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थीती चांगली होती. हे खरे नाही की, मधुकर व सिध्दु हे महिपत यांना मदत करत होते.हे खरे नाही की, महिपत यांना वादी मदत करत होते हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, वादी हा महिपत यांना औषधपाणी करत होता व देखभाल करत होता हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, महिपत यांचे तीन मुलगे उतारवयात महिपत यांचा आधार होते. हे खरे नाही की, वादी हे उतारवयात महिपत यांचा आधार होते हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, महिपत यांना वादीने कधीही सांभाळले नाही. हे खरे नाही की,दावा मिळकत मूळतः महिपत यांची होती व त्यानंतर त्यांच्या तीन मुलांकडे आली. हे खरे नाही की, आजतागायत दावा मिळकतीत गजानन, सिध्दु व मधुकर यांची वहिवाट आहे. हे खरे नाही की, दावा मिळकतीत वादीने कोणतीही झाडे लावली नाहीत व विहीर खोदली नाही. हे खरे नाही की, सन १९८० मध्ये वादीने दावा मिळकतीत विहीर खोदली व त्यामध्ये वादीचा पुर्वीपासून मांगर होता हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, सन १९८३ मध्ये वादीने दावा मिळकतीत घर बांधले व त्यामध्ये त्याचा मुलगा महेंद्र राहतो हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, दावा मिळकतीतील जमिन रस्त्याला लागून आहे. हे खरे नाही की, वादीचे संबंध बरे असल्याने त्याला दावा मिळकत मिळवून देण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे. हे खरे की,मी

तहसिल ऑफिसमध्ये कुळ कायदयाखाली केसेस केलेल्या आहेत. हे खरे की, या कोर्टात देखील माझा एक दावा आहे. हे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यावरुन खोटे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(श्रीमती एन.बी.घाटगे )

दि. ०६/११/२०२४

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड